सन २०२५ मध्ये राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे सवलतीसाठी बाधित तालुके घोषित करणे बाबत...

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग,**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई- ४०००३२

शासन निर्णय, क्रमांक:- सीएलएस-२०२५/प्र.क्र.३६५/म-३ (मदत-१),

दिनांक:- १० ऑक्टोबर, २०२५

वाचा:

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दि.१३ एप्रिल २०१५
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि.०७ ऑक्टोबर, २०१७
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१७३/२०१७/म-७, दि.२८ जून, २०१८
४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: एससीवाय-२०२१/प्र.क्र.१००/म-७, दि.२८ ऑक्टोबर, २०२१
५. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: संकिर्ण-२०२५/प्र.क्र.३६५//म-७, दि.०९ ऑक्टोबर, २०२५

प्रस्तावना:

राज्यामध्ये सद्यस्थितीत मोठ्या प्रनाणात अतिवृष्टी होऊन पूर आपत्ती परिस्थिती उद्भवलेली आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे शेती पिक/शेतजमीन यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असून, पशुहानी, मनुष्यहानी होणे, घर पडझड होणे, पुरामुळे गावातील बाधितांना स्थलांतरीत करणे या बाबत मदत देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्हास्तरीय यंत्रणेमार्फत राज्यामध्ये पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत असून त्यानुसार जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत २६.६९ लाख हेक्टर क्षेत्राचे तर सप्टेंबर २०२५ या महिन्यात जवळ-जवळ ३९ लाख हेक्टर क्षेत्राचे असे राज्यामध्ये एकूण सुमारे ६५ लाख हेक्टर क्षेत्राचे शेतीपिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे राज्यातील अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे पूर्णत: अथवा अंशत: प्रभावित तालुके संदर्भ क्र.५ मधील शासन निर्णय दि. ९ ऑक्टोबर २०२५ मधील परिशिष्ट अ अन्वये घोषित करण्यात आले होते. या मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

राज्यातील विविध तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीतील अतिवृष्टी व पूर, पेरणी खालील क्षेत्र व पिकांची स्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून या घटकांनी पूर्णत: अथवा अंशत: प्रभावित झालेले तालुके सोबतच्या सुधारित परिशिष्टानुसार आपत्तीग्रस्त घोषित करण्यात येत आहेत. सदर तालुक्यातील सर्व आपदग्रस्त/ बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती देण्याबाबत या शासन निर्णयाने मान्यता देण्यात येत आहे.

| शा. नि., क्रमांक:- सीएलएस-२०२५/प्र.क्र.३६५/म-३ (मदत-१),दिनांक:- १० ऑक्टोबर, २०२५ सोबतचे परिशिष्ट | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | अंशत: बाधित तालुके* | पूर्णत: बाधित तालुके | बाधित तालुक्यांची संख्या |
| १ | पालघर | - | पालघर, डहाणू, तलासरी, विक्रमगड | ४ |
| २ | नाशिक | कळवण, देवळा, इगतपुरी | मालेगाव, निफाड,नांदगाव,सटाणा, दिंडोरी, सुरगाणा, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पेठ, सिन्नर, चांदवड, येवला | १५ |
| ३ | धुळे | धुळे, साक्री, सिंदखेडा | - | ३ |
| ४ | जळगांव | - | एरंडोल , पारोळा, धरणगाव ,पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव , अमळनेर ,रावेर, चाळीसगाव,भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर | १३ |
| ५ | अहिल्यानगर | पारनेर, संगमनेर, अकोले | अहिल्यानगर,शेवगाव, कर्जत,पाथर्डी, नेवासा , राहाता, श्रीरामपूर, जामखेड, राहुरी, श्रीगोंदा ,कोपरगाव | १४ |
| ६ | पुणे | हवेली, इंदापूर | - | २ |
| ७ | सोलापूर | - | उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, पंढरपूर, मोहोळ, मंगळवेढा, माळशिरस, माढा, करमाळा , सांगोला | ११ |
| ८ | सांगली | कडेगाव | मिरज, वाळवा, शिराळा, पलूस, तासगाव , कवठेमहाकाळ, विटा, आटपाडी, जत | १० |
| ९ | सातारा | सातारा,कराड, पाटण, फलटण, जावळी | कोरेगाव, खटाव, माण | ८ |
| १० | कोल्हापूर | कागल ,शिरोळ, पन्हाळा | करवीर ,राधानगरी, गगनबावडा, आजरा, चंदगड | ८ |
| ११ | छ. संभाजीनगर | - | छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर,गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड,फुलंब्री | ९ |
| १२ | जालना | - | बदनापूर ,घनसावंगी, अंबड , जालना ,परतूर,मंठा , भोकरदन, जाफ्राबाद | ८ |
| १३ | बीड | - | बीड ,गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई ,परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी | ११ |
| १४ | लातूर | - | लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, शिरुरअनंतपाळ, देवणी, उदगीर, जळकोट, अहमदपूर, चाकूर | १० |
| १५ | धाराशिव | - | धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर,लोहारा,परांडा ,उमरगा | ८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | नांदेड | - | कंधार,किनवट, मुदखेड, भोकर, अर्धापूर, माहूर, नांदेड, लोहा, मुखेड, देगलूर, बिलोली,धर्माबाद, नायगाव ,हदगाव, हिमायतनगर, उमरी | १६ |
| १७ | परभणी | - | पूर्णा ,पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी | ९ |
| १८ | हिंगोली | - | हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव , वसमत | ५ |
| १९ | बुलढाणा | नांदूरा, संग्रामपुर | चिखली, सिंदखेडराजा , देऊळगावराजा, लोणार, शेगाव, मोताळा, बुलढाणा, खामगाव, मेहकर,मलकापूर , जळगावजामोद | १३ |
| २० | अमरावती | - | अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा , धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर | १४ |
| २१ | अकोला | - | अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर, बार्शीटाकळी | ७ |
| २२ | वाशिम | - | वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर , कारंजा, मानोरा | ६ |
| २३ | यवतमाळ | - | पुसद, यवतनाळ, बाभूळगाव, मारेगाव,महागाव, उमरखेड,कळंब,घाटंजी, राळेगाव, दारव्हा, आर्णी, नेर, दिग्रस, पांढरकवडा, वणी , झरी -जामणी | १६ |
| २४ | वर्धा | - | वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, कारंजा ,आष्टी | ८ |
| २५ | नागपूर | - | नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा,उमरेड, कुही, नरखेड | १३ |
| २६ | भंडारा | - | साकोली, भंडारा,मोहाडी,तुमसर ,पवनी , लाखनी, लाखंदूर | ७ |
| २७ | गोंदिया | तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, मोरअर्जुनी, सालेकसा, सडक अर्जुनी, आमगाव | देवरी | ८ |
| २८ | चंद्रपूर | - | चंद्रपूर, भद्रावती, राजूरा , बल्लारपूर, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा, जिवती, ब्रम्हपुरी | १४ |
| २९ | गडचिरोली | चारमोशी, कोरची | गडचिरोली, धानोरा, मूलचेरा, आरमोरी, कुरखेडा, अहेरी, सिरोचा, भामरागड, एटापली, देसाइगंज (वडसा) | १२ |
| | एकूण | ३१ | २५१ | २८२ |

* अंशतः बाधित तालुक्यामध्ये प्रत्यक्ष बाधित मंडळ सवलतीस पात्र असतील.

SURYAWANSHI SAMPAT DASHARATH

Digitally signed by SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=E2D0677DC3B9F523D6452EDD479C3B2EDC08B7C9102B4130AE3EF3DD803B7322, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F8D5F07D73B60D7311256SDB98AEE680FFADE9B8758D5A695368E1D3656632DD, cn=SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
Date: 2025.10.11 00:02:08 +05'30'